# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी क्र.
२४०१०४३७/२४०२०७८१
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : eb@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २ रा मजला,
शीव माटुंगा स्किम रोड क्र. ८
शीव सर्कलसमोर, शीव (पूर्व)
मुंबई - ४०० ०२२

"आपली सेवा आमचे कर्तव्य"

जा.क्र. मप्रनि/आस्था/ब-१८७

दिनांक १३/०२/२०२५

## ** पदभरती- मुलाखत सूचना **

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने इन्स्टिटयुट ऑफ बँकींग पर्सोनेल सिलेक्शन (IBPS) या संस्थेद्वारे सरळसेवा भरतीसाठी दिनांक २७/०९/२०२४ व २८/०९/२०२४ या कालावधीत घेतलेल्या ऑनलाईन परीक्षेमध्ये उमेदवारांना पदनिहाय प्राप्त झालेले गुण मंडळाच्या संकेतस्थळावर दिनांक ३०/१२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. त्यानुसार गट 'अ' मधील प्रादेशिक अधिकारी, वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी व वैज्ञानिक अधिकारी या पदांकरिता मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची पदनिहाय यादी याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर यादीमध्ये समाविष्ठ उमेदवारांनी मुलाखतीस येताना संबंधीत पदांसाठी लागू असलेले तसेच अर्जामध्ये अपलोड केलेले दस्तऐवज /प्रमाणपत्रांच्या मूळ व स्वसाक्षांकित प्रतीसह खालील नमूद ठिकाणी समक्ष उपस्थित रहावे.

| अ.क्र. | संवर्ग | मुलाखतीचा दिनांक व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | प्रादेशिक अधिकारी | दिनांक २८/०२/२०२५ सकाळी १०.०० | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, ४ था मजला, कॉन्फरन्स हॉल, शीव-माटुंगा स्किम रोड क्र. ८, शीव सर्कलजवळ, शीव (पूर्व), मुंबई ४०० ०२२ |
| २ | वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी | | |
| ३ | वैज्ञानिक अधिकारी | | |

संबंधीत उमेदवारांना याबाबत त्यांच्या ई-मेलवर मुलाखत पत्रे पाठविण्यात येतील.

मुलाखतीस येताना उमेदवाराने स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला ओळखीचा पुरावा उदा. आधारकार्ड, पॅन कार्ड व त्याची स्वसाक्षांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. आरक्षित जागेकरिता अर्ज केला असल्यास त्या पृष्ठयर्थ आवश्यक असणारी सर्व मूळ प्रमाणपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे.

सदर मुलाखतीस अनुपस्थित राहणाऱ्या उमेदवारांस पुन्हा मुलाखतीसाठी बोलाविण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर मुलाखत प्रक्रियेबाबत मंडळाचा निर्णय अंतिम राहील व तो सर्व उमेदवारांना बंधनकारक राहील.

(डॉ. अविनाश ढाकणे, भा.प्र.से.)
सदस्य सचिव